13 MAR 2025
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्रियांच्या संघर्षात मानवमुक्तीची प्रेरणा

## डेल्फिम कोरेइया द सिल्वा : पोर्तुगीज चित्रपट महोत्सवाला प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्त्रिया या समाजाच्या मजबूत स्तंभ आहेत. त्यांचे संघर्ष मानवमुक्तीची, मानवी जगाच्या निर्मितीची प्रेरणा देतात. भारत आणि पोर्तुगालमध्ये मैत्रीपूर्ण संबंध आहेत. कोल्हापुरातील विद्यार्थ्यांनी पोर्तुगीज भाषा शिकून करिअरच्या विविध संधी घ्याव्यात, असे मत द कमॉइश इन्स्टिट्यूट, लिस्बन, पोर्तुगालचे प्रतिनिधी डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांनी बुधवारी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग आणि द कमॉइश इन्स्टिट्यूट या दोन संस्थांमधील सामंजस्य करारांतर्गत बुधवारी (दि.१२) व गुरुवारी (दि.१३) आयोजित 'पोर्तुगीज चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा उपस्थित होत्या.



शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग आणि द कमॉइश इन्स्टिट्यूटतर्फे आयोजित पोर्तुगीज चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन बुधवारी डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्रा. मेघा पानसरे उपस्थित होत्या.

### महोत्सवात आज

दुपारी २.०० ते ४.०० या वेळेत निलांबरी हॉल, वनस्पतीशास्त्र विभाग येथे दोन चित्रपटांचे प्रदर्शन

13 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पोर्तुगीज चित्रपट महोत्सवास प्रारंभ

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग आणि द कमॉइश इन्स्टिट्यूट या दोन संस्थांमधील सामंजस्य करारांतर्गत आजपासून विद्यापीठत पोर्तुगीज चित्रपट महोत्सवाला प्रारंभ झाला. गुरुवारी (ता. १३) वनस्पतीशास्त्र विभागाच्या नीलांबरी हॉलमध्ये दुपारी दोन ते चार या वेळेत चित्रपट प्रदर्शित होणार आहेत.

पोर्तुगालच्या द कमॉइश इन्स्टिट्यूटचे प्रतिनिधी डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांच्या हस्ते महोत्सवाला प्रारंभ झाला. ते म्हणाले, 'विविध देशांतील, भाषांतील चित्रपट प्रेक्षकांना हे जग समजून घेण्याचा एक वेगळा दृष्टिकोन देतात. पोर्तुगीज चित्रपट महोत्सवातील चित्रपटांमधून पोर्तुगाल, भारत आणि ब्राझील या देशांतील वैश्विक बंध बनलेल्या विविध महिलांचे जीवन व्यक्त होते.'



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी पोर्तुगीज चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन करताना डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. मेघा पानसरे.

महिला या समाजाच्या मजबूत स्तंभ आहेत. त्यांचे संघर्ष मानवमुक्तीची, अधिक मानवी जगाच्या निर्मितीची प्रेरणा देतात. भारत आणि पोर्तुगाल या देशांत आता अतिशय मैत्रीपूर्ण संबंध आहेत. कोल्हापुरातील विद्यार्थ्यांनी पोर्तुगीज भाषा शिकून करिअरच्या विविध संधी घ्याव्यात, असेही ते म्हणाले.

कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'चित्रपट हे केवळ मनोरंजनासाठी नसतात. ते पाहताना एखादे पुस्तक वाचल्याचा अनुभव मिळतो. जागतिक आणि भारतीय भाषांतील चित्रपट पाहण्यातून माणसाचे जग समृद्ध होते. विद्यार्थ्यांनी विदेशी भाषा शिकून जगणे समृद्ध करावे.'

विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा उपस्थित होत्या.

13 MAR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पोर्तुगीज भाषा शिकून करिअरच्या संधी घ्याव्यात

## पोर्तुगालचे प्रतिनिधी डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांचे विद्यार्थ्यांना आवाहन


प्रतिनिधी

कोल्हापूर

स्त्रिया या समाजाच्या मजबूत स्तंभ आहेत. त्यांचे संघर्ष मानवमुक्तीची, अधिक मानवी जगाच्या निर्मितीची प्रेरणा देतात. भारत आणि पोर्तुगाल या देशांत आता अतिशय मैत्रीपूर्ण संबंध आहेत. कोल्हापुरातील विद्यार्थ्यांनी पोर्तुगीज भाषा शिकून करिअरच्या विविध संधी घ्याव्यात, असे आवाहन द कमोंइश इन्स्टिट्यूट, लिस्बन, पोर्तुगालचे प्रतिनिधी डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग आणि द कमोंइश इन्स्टिट्यूट या दोन संस्थांमधील सामंजस्य कराराअंतर्गतआयोजित 'पोर्तुगीज चित्रपट महोत्सवा'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "चित्रपट हे केवळ मनोरंजनासाठी नसतात. ते पाहताना एखादे पुस्तक वाचल्याचा अनुभव मिळतो. जागतिक आणि भारतीय भाषांतील चित्रपट पाहण्यातून माणसाचे जग समृद्ध होते. विद्यार्थ्यांनी विदेशी भाषा शिकून आपले जगणे समृद्ध करावे. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. प्रियांका माळकर, ज्योती पाटील, गीतांजली शहा उपस्थित होत्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पोर्तुगीज चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन रोपट्याला पाणी घालून करताना पोर्तुगालचे प्रतिनिधी डॉ. डेल्फिम कोरेइया द सिल्वा. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. मेघा पानसरे.

13 MAR 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे महाराष्ट्र अग्रेसर

## माजी प्राचार्य डॉ. गणपतराव कणसे यांचे प्रतिपादन : सहकार क्षेत्रामध्ये त्यांच्या निर्णयामुळे प्रचंड क्रांती

प्रतिनिधी
कोल्हापूर

व्यक्ती संपत्तीवर मोठा होत नाही तर त्यांनी अंगीकारलेल्या संस्कारावर मोठा होतो. हे यशवंतराव चव्हाणांनी आपल्या यशस्वी कारकिर्दीत दाखवून दिले आहे. ते आपल्या संस्काराच्या भक्कम पायांवर उभे राहिले म्हणून आज आपण सगळे त्यांचे स्मरण करतो. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य नेहमी अग्रेसर रहावे यासाठी विशेष प्रयत्न केले, असे प्रतिपादन कराड येथील टिळक हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य गणपतराव कणसे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट यांच्या वतीने भारताचे दिवंगत उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन केले होते. 'यशवंतराव चव्हाण : संस्काराचे अमृतकुंभ' हा व्याख्यानाचा विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते.यशवंतराव चव्हाण यांच्या दुर्मिळ छायाचित्रांचे प्रदर्शन पाहण्यासाठी मोठी गर्दी होती.



कोल्हापूर : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना माजी प्राचार्य डॉ. गणपतराव कणसे.

माजी प्राचार्य कणसे म्हणाले, व्यक्तीपेक्षा देश मोठा ही पवित्र भावना यशवंतराव चव्हाणांनी लोकांच्या मनामध्ये रूजविली. देवराष्ट्र सारख्या एका दुर्गम भागात सर्वसामान्य शेतकरी कुटुंबामध्ये त्यांचा जन्म झाला. आई, वडील आणि गुरूजनांकडून मिळालेल्या संस्काररूपी शिदोरीच्या जोरावरच राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, सहकार, कला-क्रीडा या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांनी भरीव कामगिरी केली. शिक्षण क्षेत्रामुळे सर्व क्षेत्रांला ऊर्जा प्राप्त होते याचे भान त्यांना होते. कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मोफत शिक्षण मिळावे यासाठी ते आग्रही होते. म्हणूनच प्रसंगी मुख्यमंत्रीपदाचा त्याग करण्यासही ते मागे-पुढे पाहिले नव्हते. सहकार क्षेत्रामध्ये त्यांच्या निर्णयामुळे प्रचंड क्रांती झाली. महाराष्ट्र ही भारत देशाची प्रयोगशाळा ठरते ही सगळी किमया यशवंतराव चव्हाण यांची आहे.

अधिष्ठाता डॉ. देशमुख म्हणाले, दुर्गम भागातील व्यक्ती आपल्या संस्काराच्या जोरावर देशाच्या प्रगतीमध्ये आणि जडणघडणीमध्ये मोठे योगदान देण्याचे महत्वपूर्ण कार्य यशवंतराव चव्हाण यांच्याकडून घडले. राज्याची, देशाची प्रगती व्हावी, सर्वसामान्य माणसाचा विकास करण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. सहकार क्षेत्रामध्ये केलेले त्यांचे कार्य देशाला दिशादर्शक ठरले. डॉ. नितीन माळी यांनी स्वागत केले. डॉ. उर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन केले. यशवंतराव चव्हाण अध्यासनाचे समन्वयक डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ.कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार आदी उपस्थित होते.

### स्पर्धेचा निकाल

**पोस्टर स्पर्धा :** वरूण अमृते प्रथम, नेहा शिंदे व्दितीय, सुकन्या निकम तृतीय. **निबंध स्पर्धा :** नेहा शिंदे प्रथम, सुकन्या निकम व्दितीय, श्रेया म्हापसेकर तृतीय. **रिल स्पर्धा :** आरपीता सावंत प्रथम, आदित्य देसाई व्दितीय, प्रथमेश पाटील तृतीय.

13 MAR 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण यांची छायाचित्रे पाहता येणार

## शिवाजी विद्यापीठात प्रदर्शन


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट येथे यशवंतराव चव्हाण यांच्या दुर्मीळ छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी प्राचार्य डॉ. गणपतराव कणसे (कऱ्हाड) आणि मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते झाले.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट यांच्यातर्फे देशाचे दिवंगत उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त या उपक्रमाचे आयोजन केले आहे. तत्पूर्वी, शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तुकाराम चौगुले, क्रीडा अधिविभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, माजी प्राचार्य गणपतराव कणसे, डॉ. संतोष सुतार, डॉ. उमेश गडेकर आदी उपस्थित होते.

कै. यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटतर्फे उपक्रमाचे आयोजन

गणपतराव कणसे यांनी 'यशवंतराव चव्हाण : संस्काराचे अमृतकुंभ' यावर व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानी डॉ. महादेव देशमुख होते. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक, डॉ. उर्मिला दशवंत यांनी सूत्रसंचालन, तर समन्वयक डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी यशवंतराव चव्हाण यांच्या दुर्मीळ छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन माजी प्राचार्य डॉ. गणपतराव कणसे, डॉ. महादेव देशमुख यांच्या हस्ते झाले.

### स्पर्धेतील विजेत्यांची नावे -

**पोस्टर स्पर्धा :** वरूण अमृते, नेहा शिंदे, सुकन्या निकम.
**निबंध स्पर्धा :** नेहा शिंदे, सुकन्या निकम, श्रेया म्हापसेकर.
**रिल स्पर्धा :** अर्पिता सावंत, आदित्य देसाई, प्रथमेश पाटील.

13 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाणांनी व्यक्तीपेक्षा देश मोठा असल्याची भावना रुजविली

## डॉ. गणपतराव कणसे; विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. १२ : 'व्यक्ती संपत्तीवर मोठा होत नाही, तर त्यांनी अंगीकारलेल्या संस्कारावर मोठा होतो. हे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या यशस्वी कारकिर्दीत दाखवून दिले. व्यक्तीपेक्षा देश मोठा ही पवित्र भावना त्यांनी लोकांच्या मनामध्ये रुजविली', असे प्रतिपादन कराड येथील टिळक हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. गणपतराव कणसे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे भारताचे दिवंगत उपपंतप्रधान व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'यशवंतराव चव्हाण : संस्काराचे अमृतकुंभ' या विषयावरील व्याख्यानात डॉ. कणसे बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते.

**दुर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन**

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट येथे यशवंतराव चव्हाण यांच्या दुर्मीळ छायाचित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. कणसे यांनी केले. तत्पूर्वी, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

13 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मान्सूनविषयी संशोधनाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज

## डॉ. सुनील पवार : विद्यापीठात हवामान बदलविषयक कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १२ : 'मान्सून हा भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वाधिक महत्त्वाचा स्रोत आहे. त्यामुळे त्याविषयी अभ्यास आणि संशोधन महत्त्वाचे ठरते', असे प्रतिपादन पुण्याच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजीचे वरिष्ठ हवामानशास्त्रज्ञ डॉ. सुनील पवार यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठात 'हवामान बदल आणि भारतीय मान्सून' या विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाचा भूगोल अधिविभाग, हवामान बदल आणि शाश्वत केंद्र, पर्यावरण शास्त्र विभाग, संख्याशास्त्र अधिविभाग आणि पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीतर्फे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

'भारतीय उपखंडाच्या दृष्टीने मोसमी वारे आणि मोसमी पावसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे त्यांचा अभ्यास आणि अंदाज या बाबी आवश्यक आहेत. तो केवळ हवामान अगर पर्यावरणाचा घटक नाही, तर भारतीय अर्थकारणाचा प्रमुख स्रोत म्हणूनच आपण त्याकडे पाहिले पाहिजे. या हवामान बदलाचे परिणाम भारतीय मान्सूनवरही होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या विषयाचा अभ्यास आणि संशोधन याकडे गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेत बोलताना वरिष्ठ हवामानशास्त्रज्ञ डॉ. सुनील पवार. यावेळी डावीकडून डॉ. सचिन पन्हाळकर, दादा नाडे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

### प्रभाव, उपाययोजनांबाबत मार्गदर्शन

■ या कार्यशाळेतील विविध सत्रांत आयआयटीएमचे हवामानशास्त्रज्ञ डॉ. हाफजा वरिकोडण, सूरज के. पी., प्रशांत पिल्लई यांनी मान्सूनवरील हवामान बदलाचा प्रभाव, संभाव्य परिणाम आणि त्यावरील वैज्ञानिक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'हवामान बदल हा आता काही केवळ भूगोल किंवा पर्यावरणशास्त्राचा विषय राहिलेला नाही. त्यामुळे सर्वच क्षेत्रांतील अभ्यासक, संशोधकांनी त्यासाठी पुढे येणे आवश्यक आहे. विद्यापीठाचे पन्हाळा येथील अवकाश संशोधन केंद्र आणि भूगोल अधिविभाग येथे आयआयटीएम काही अत्याधुनिक उपकरणे बसविणार आहे. त्या डेटाचाही संशोधन व विश्लेषणासाठी मोठा उपयोग होईल.' यावेळी भारती विद्यापीठाचे डॉ. दादा नाडे, डॉ. सचिन पन्हाळकर, आसावरी जाधव, शशिभूषण महाडिक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 20..

पुण्यनगरी

# अर्थव्यवस्थेसाठी मान्सूनविषयी संशोधन महत्त्वाचे : डॉ. सुनील पवार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मान्सून हा भारतीय अर्थव्यवस्थेचा सर्वाधिक महत्त्वाचा स्रोत आहे. त्यामुळे त्याविषयी अभ्यास आणि संशोधन महत्त्वाचे ठरते, असे प्रतिपादन पुण्याच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजीचे वरिष्ठ हवामानशास्त्रज्ञ डॉ. सुनील पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात 'हवामान बदल आणि भारतीय मान्सून' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाचा भूगोल अधिविभाग, हवामान बदल आणि शाश्वत केंद्र, पर्यावरणशास्त्र विभाग, संख्याशास्त्र अधिविभाग आणि पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

डॉ. पवार म्हणाले, एका अर्थाने आपले संपूर्ण जीवन त्यावर अवलंबून आहे. हवामान बदलाचेही तीव्र परिणाम जगभर दिसून येत आहेत. औद्योगिकीकरण, वायू प्रदूषण आणि वाढते तापमान यामुळे नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढले आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, हवामान बदल हा आता काही केवळ भूगोल किंवा पर्यावरणशास्त्राचा विषय राहिलेला नाही. कोणताही विषय अथवा क्षेत्र त्यापासून अस्पर्शित राहिलेले नाही. त्यामुळे सर्वच क्षेत्रांतील अभ्यासक, संशोधकांनी त्यासाठी पुढे येणे आवश्यक बनले आहे.

यावेळी भारती विद्यापीठाचे डॉ. दादा नाडे प्रमुख उपस्थित होते. डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, डॉ. आसावरी जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर डॉ. शशीभूषण महाडिक यांनी आभार मानले.

कार्यशाळेत पुढे दिवसभरात झालेल्या विविध सत्रांत आयआयटीएमचे प्रसिद्ध हवामानशास्त्रज्ञ डॉ. हाफजा वरिकोडण, डॉ. सुरज के. पी. आणि डॉ. प्रशांत पिल्लई यांनी मान्सूनवरील हवामान बदलाचा प्रभाव, संभाव्य परिणाम आणि त्यावरील वैज्ञानिक उपाययोजनांबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

13 MAR 2025 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विकसित भारतासाठी प्रगत संशोधने महत्त्वाची

## डॉ. पी. एस. पाटील : विद्यापीठात हम्बोल्ट फेलोशिपबाबत परिसंवाद

कोल्हापूर, ता. ११ : विविध क्षेत्रांतील प्रगत संशोधने विकसित भारताच्या निर्मितीसाठी महत्त्वाची आहेत, असे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँन्ड बायोटेक्नॉलॉजी, इंटरनॅशनल अफेयर्स सेल्स, हम्बोल्ट ॲकॅडमी पुणे चॅप्टर व महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सतर्फे पीएम-उषा योजनेच्या माध्यमातून प्रतिष्ठेच्या 'अलेक्झांडर वॉन हम्बोल्ट पोस्ट डॉक्टरल फेलोशिप' विषयावर परिसंवाद झाला. त्यावेळी ते बोलत होते. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयात पदार्थविज्ञान, सूक्ष्मजीवशास्त्र, नॅनोसायन्ससह इंग्रजी विषयांत, नुकत्याच पीएच.डी. पदवी प्राप्त, पीएच.डी. चा प्रबंध जमा केलेल्या एकूण ५० विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग नोंदवला.

पहिल्या सत्रात प्रा. डॉ. मनोहर बडिगर यांनी हम्बोल्ट फेलोशिपबाबत संपूर्ण माहिती दिली. प्रा. डॉ. अशोक गिरी यांनी त्यांच्या संशोधनाचा काही भाग सादर करत कशा पद्धतीचे संशोधन फेलोशिपसाठी पूरक असेल याविषयी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. जयंत खंदारे यांनी 'लिक्विड बायोप्सी' या कॅन्सर निदानाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाबाबत नवीन निर्माण केलेल्या निदान पद्धतीविषयी माहिती दिली.

स्कूल ऑफ नॅनो सायन्सचे संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा, इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक डॉ. एस. बी. सादळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँन्ड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातील शिक्षक व कर्मचारी यांनी परिसंवादासाठी परिश्रम घेतले.

13 MAR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अंदाजपत्रकात संशोधनाला मिळणार चालना

## गतवर्षीची साडेपाच कोटींची तूट भरून निघणार

## शिष्यवृत्ती व संशोधनासाठी जवळपास ७ कोटींची तरतूद

## जवळपास ५० कोटींपेक्षा अधिक रक्कमेचे अंदाजपत्रक




अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे वार्षिक अंदाजपत्रक म्हटले की शैक्षणिक व संशोधनावर भरीव तरतूद करणारे अंदाजपत्रक मानले जाते. गेल्या दोन वर्षाच्या अंदाजपत्रकात काळानुरूप बदल करून संशोधनासह प्रशासकीय कामात नवीन इमारतींनाही भरभरून निधी दिला आहे. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या लेखापरीक्षण अहवालावर लेखापरीक्षकाने ताशेरे ओढले होते. त्यामुळे डिसेंबर महिन्यात झालेल्या अधिसभेत सदस्यांनी गोंधळ घातला होता. लेखापरीक्षणाचा अहवाल दुरुस्त करून देण्याचे आश्वासन विद्यापीठ प्रशासनाने दिल्याप्रमाणे लेखापरीक्षणाचा अहवाल देण्यात आला आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कार्यकालावधीतील हे अखेरचे अंदाजपत्रक असल्याने ते बिनचूक आणि संशोधनाला चालना देणारे असल्याचे बोलले जात आहे. हे अंदाजपत्रक शनिवार १५ मार्च रोजी विद्यापीठात होणाऱ्या अधिसभेत सादर केले जाणार आहे.

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा म्हटले की अधिसभा सदस्यांचा गोंधळ हमखास ठरलेला आहे. परंतु प्रशासकीय कामाचा ३५ वर्षाचा अनुभव गाठीशी असल्याने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी अधिसभा सदस्यांना समर्पक उत्तरे देवून उत्तम प्रशासक असल्याचे सिध्द केले आहे. म्हणूनच सभात्याग सारख्या घटना फारशा घडलेल्या नाहीत. संशोधन, दर्जेदार शिक्षण, क्रीडा यासह प्रशासकीय कामावरदेखील कुलगुरूंची चांगली कमांड आहे. त्यामुळेच त्यांनी परीक्षेचे संपूर्ण कामकाज ऑनलाईन मोडवर आणून एक प्रकारे क्रांतीच केली आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. स्वत:ची एसआरपीडी तयार केली असून प्रश्नपत्रिका पाठवल्यापासून ते उत्तरपत्रिकांची ऑनस्क्रिन तपासणीपर्यंतची सर्व कामे ऑनलाईन पध्दतीने केली जात आहेत. तसेच बरेच दिवस रखडलेल्या मुधारी मार्गाला जवळपास शासनाकडून ७ कोटी निधी आणून एक वर्षात हा मार्ग पूर्ण केला. त्यामुळे दुचाकीस्वार व पादचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे, ही कौतुकास्पद गोष्ट आहे.

### खेळाडूंना प्रोत्साहन

खेळाडूंना वेळप्रसंगी विमानाने जाण्याची परवानगी दिली. तसेच खेळाडूंच्या दैनंदिन भत्यात दोनवेळा वाढ करीत पौष्टिक आहार देण्याचे काम केले. खेळाडूंनीसुध्दा अनेक पदके मिळवून विद्यापीठाला दिली आहेत. यामध्ये १८ खेळाडूंनी ऑल इंडिया विविध खेळांमधील स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले. ॲथलेटिक्समध्ये जनरल चॅम्पियनशिप मिळवली. खेलो इंडियामध्ये बाराव्या क्रमांकाचे स्थान मिळवले. फ्रान्स येथे स्पर्धेत बारा खेळाडूंपैकी ६ खेळाडू शिवाजी विद्यापीठाचे होते. शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार, अर्जुन पुरस्कार मिळवून विद्यापीठाची मान उंचावली आहे. खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी कुलगुरूंनी मॅटवरील कुस्ती संकुल, खेळाडू वस्तीगृहाची निर्मिती करून खेळाडूंना प्रोत्साहन दिले आहे.

### यंदाच्या अंदाजपत्रकातील तरतूद

| | |
|---|---|
| कुस्ती संकुल, वसतिगृह | ३ कोटी ५० लाख |
| शैक्षणिक व संशोधनासाठी | १.५० कोटी |
| कमवा व शिका दैनंदिन खर्च | ४ कोटी |
| मेरीट स्कॉलरशिप | ६ कोटी |
| दिव्यांगांच्या सुविधा | २ कोटी |
| विद्यार्थी कल्याण व युवा वसतिगृह इमारतीसाठी | २ कोटी |
| सर्वांगीण विद्यार्थी विकास आणि संगणक सुविधा केंद्र | ५ कोटी |

### पीएम उषा अंतर्गत २० कोटींचा निधी

पीएम उषा योजनेअंतर्गत संशोधनासाठी २० कोटींचा निधी शिवाजी विद्यापीठला मिळाला आहे. या योजनेअंतर्गत संशोधनासाठी लागणारी उपकरणे, प्रशिक्षण वर्ग आणि स्टार्टअपसाठीही मदत केली जाते. विद्यापीठाच्या निधीतून संशोधक विद्यार्थीनींसाठी वसतिगृह बांधून त्यांच्या राहण्याचा प्रश्न मार्गी लावला आहे.सध्या सर्व अभ्यासक्रम स्वतंत्र इमारतीमध्ये सुरू आहेत. पर्यावरण संवर्धनासाठीही विशेष तरतूद केली आहे.

13 MAR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




कोल्हापूर : पंजाबमधील चित्कारा विद्यापीठात झालेल्या आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान गटात तृतीय क्रमांक मिळविला.

# आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेत विद्यापीठ तृतीय

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : पंजाबमधील चित्कारा विद्यापीठात झालेल्या आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान गटात तृतीय क्रमांक मिळविला.

शैक्षणिक वर्ष २०२४ -२०२५ मधील आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धा चित्कारा विद्यापीठ, पंजाब येथे १० ते ११ मार्च या कालावधीत झाली. स्पर्धेमधील तीन संशोधन शाखांसाठी शिवाजी विद्यापीठामार्फत आठ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या शाखेतून शुभम गिरिगोसावी, बालाजी पाटील, रोहित गवळी या विद्यार्थ्यांच्या संघाने तृतीय क्रमांक मिळविला.

या विद्यार्थ्यांसोबत समन्वयक म्हणून डॉ. पी. के. पवार (जीवरसायनशास्त्र अधिविभाग), तर संघव्यवस्थापक म्हणून सुशांत पंगम (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज), डॉ. शुभांगी कांबळे (देशभक्त आनंदराव बी. नाईक कॉलेज, चिखली) होते. या संघाला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. टी. एम. चौगले, डी. एच. दगडे, टी. डी. डोंगळे, एस. डी. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2025

तरुण भारत

# अन्वेषण संशोधन स्पर्धेत विद्यापीठाचे विद्यार्थी तृतीय

**कोल्हापूर :** पंजाबमधील चित्कारा विद्यापीठात झालेल्या आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी व तंत्र गटात तृतीय क्रमांक पटकावला.

शैक्षणिक वर्ष २०२४ –२०२५ मधील आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धा पंजाब येथील चित्कारा विद्यापीठात झालेल्या स्पर्धमधील ३ संशोधन शाखांसाठी शिवाजी विद्यापीठामार्फत ८ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या शाखेतून शुभम गिरीगोसावी, बालाजी प्रकाश पाटील व रोहित गणपती गवळी या विद्यार्थ्यांच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला. सदर विद्यार्थ्यासोबत समन्वयक म्हणून डॉ पी. के. पवार (जीवरसायनशास्त्र अधिविभाग) तर संघव्यवस्थापक म्हणून सुशांत सुरेश पंगम (शिवराज कॉलेज, गडहिंग्लज) व डॉ शुभांगी रामचंद्र कांबळे (देशभक्त आनंदराव बी. नाईक कॉलेज, चिखली) होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2025
लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा तृतीय क्रमांक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पंजाबमधील चित्कारा विद्यापीठात झालेल्या आंतरराष्ट्रीय अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संशोधक विद्यार्थ्यांची अभियांत्रिकी स्पर्धा १० व ११ मार्चला झाली. स्पर्धेमधील तीन संशोधन शाखांसाठी शिवाजी विद्यापीठामार्फत आठजणांचा संघ सहभागी झाला. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या शाखेतून शुभम गिरीगोसावी, बालाजी प्रकाश पाटील आणि रोहित गणपती गवळी या विद्यार्थ्यांच्या संघाने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या विद्यार्थ्यांसोबत समन्वयक म्हणून डॉ. पी. के. पवार, संघव्यवस्थापक म्हणून सुशांत सुरेश पंगम आणि डॉ. शुभांगी कांबळे होते. स्पर्धेसाठी विद्यापीठ संघास कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. टी. डी. डोंगळे, डॉ. एस. डी. जाधव, विद्यार्थी विकास विभागातील सर्व प्रशासकीय सेवक यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2025

पुण्यनगरी

# अर्णव बुवा यांचे गायनमध्ये यश

गडहिंग्लज : येथील शिवराज महाविद्यालयाचा विद्यार्थी अर्णव मच्छिंद्र बुवा याने अमेठी विद्यापीठ, नोएडा (उत्तर प्रदेश) येथे आयोजित अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवामध्ये शास्त्रीय गायन कला प्रकारात शिवाजी विद्यापीठ संघातून सुवर्णपदक पटकावले. त्याबद्दल अर्णवला सुवर्णपदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरवण्यात आले. अर्णवच्या या दैदीप्यमान यशाचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.



यापूर्वी देखील मध्यवर्ती युवक महोत्सव, राज्यस्तरीय युवक महोत्सव, पश्चिम विभागीय युवक महोत्सवामध्ये अर्णवने सुवर्णपदकावर आपली मोहर उमटवली आहे. हरियाणा येथील जगजीत सिंग शास्त्रीय संगीत स्पर्धेतही प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल रोख ७० हजार रुपये व प्रशस्तीपत्र देऊन त्याला गौरवण्यात आले. अर्णवला शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, ॲड. दिग्विजय कुराडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांचे प्रोत्साहन, तर स्वरसाधना संगीत महाविद्यालयाचे प्राचार्य मच्छिंद्र बुवा, वर्षा बुवा, डॉ. रंगराव हेंडगे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2025

पुण्यनगरी

# केआयटीमध्ये शेतीविषयक आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि केआयटी अभियांत्रिकी (प्रदत्त स्वायत्त) महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'केआयटी'च्या मुख्य सेमिनार हॉलमध्ये गुरुवारी (दि. १३) दुपारी ३.३० वाजता उद्योगभूषण शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. यामध्ये बिद्री येथील दूधसाखर महाविद्यालयाचे डॉ. नेताजी पाटील यांचे 'शाश्वत शेती-ग्रामीण विकासाचा पाया' या विषयावर व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी डॉ. सागर डेळेकर तर शशीताई देसाई प्रमुख उपस्थित असतील. या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे, केआयटीचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 MAR 2025
Times of India

# Event on impact of climate change on Indian monsoon

**Kolhapur:** A one-day workshop on 'Climate Change and The Indian Summer Monsoon' was held on Wednesday at Shivaji University, Kolhapur. Experts from the IITM-Pune discussed monsoon variability, extreme weather events, and future projections.

Jointly organised by SUK's geography, environmental science, and statistics departments, along with IITM-Pune and Dr Patangrao Kadam Mahavidyalaya, Sangli, the event highlighted monsoon's economic and ecological importance. While Dr Sunil Pawar emphasised its role in economy, while SUK VC D T Shirke stressed the need for interdisciplinary climate research. TNN